# बृहन्मुंबई महानगरपालिका

## माऊंट मेरी जत्रोत्सव २०२४ (बांद्रा जत्रोत्सव २०२४) दरम्यान फेरीवाल्यांच्या तात्पुरत्या बैठया पिचेससाठी अर्ज-विक्री व पिच-वाटप प्रक्रीयेबाबत.

माऊंट मेरी जत्रोत्सव-२०२४ (बांद्रा जत्रोत्सव-२०२४) हे दि.०८.०९.२०२४ ते १५.०९.२०२४ (दोन्ही दिवसांचा समावेश) या कालावधीत संपन्न होणार आहे. माऊंट मेरी रोड व केन रोड येथे मेणबत्त्या व पूजेचे साहित्य यांची विक्री करण्याकरिता २८० पिचेस तसेच रिबेलो रोड व सेंट जॉन बाप्टीस्टा रोड येथे इतर वस्तू म्हणजेच करमणुकीची खेळणी, कपडे इ. वस्तूंची विक्री करण्याकरिता अनुक्रमे ५० आणि १०० पिचेस १.५ मी x१.५ मी इतक्या आकारमानाच्या बैठया पिचेसकरीता स्थानिक व सर्वसाधारण जनता यांच्याकडून मुंबई महानगरपालिकेतर्फे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1) माऊंट मेरी रोडकडील बाजू - गुलाबी नमुन्यातील अर्ज**

- चर्च पासून १ ते २० पिचेस
- वाटप पध्दत - लिलाव प्रक्रीया (सामान्य जनतेसाठी)
- अर्ज स्विकृती दिनांक - २०.०८.२०२४ ते २२.०८.२०२४ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००.
- अर्जांची छाननी - दि.२९.०८.२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. पासून.
- लिलावाची किंमान रक्कम – रु.१,१७,८९९/-

**2) माऊंट मेरी रोड व केन रोडकडील बाजू - पांढरा नमुन्यातील अर्ज**

- पिच क्र.२१ ते २८०
- वाटप पध्दत - स्थानिक रहिवाशांसाठी राखीव
- अर्ज स्विकृती दिनांक - २०.०८.२०२४ ते २२.०८.२०२४ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००.
- अर्जांची छाननी - दि.२९.०८.२०२४ सकाळी १०.३० वा. पासून.
- तात्पुरता पिच परवाना शुल्क रु.२७२३/-

**3) रिबेलो रोडकडील बाजू - निळा नमुन्यातील अर्ज**

- पिच क्र.०१ ते ५०
- वाटप पध्दत - लिलाव प्रक्रीया (सामान्य जनतेसाठी)
- अर्ज स्विकृती दिनांक - २०.०८.२०२४ ते २२.०८.२०२४ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००.
- अर्जांची छाननी - दि.२९.०८.२०२४ सकाळी १०.३० वा. पासून.
- तात्पुरता पिच परवाना शुल्क रु.२७२३/-

**4) सेंट जॉन बाप्टिस्टा रोडकडील बाजू - पिवळा नमुन्यातील अर्ज**

- पिच क्र.०१ ते १००
- वाटप पध्दत - लिलाव प्रक्रीया (सामान्य जनतेसाठी)
- अर्ज स्विकृती दिनांक - २०.०८.२०२४ ते २२.०८.२०२४ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००.
- अर्जांची छाननी - दि.२९.०८.२०२४ सकाळी १०.३० वा. पासून.
- तात्पुरता पिच परवाना शुल्क रु.२७२३/-

सर्व प्रकारच्या बैठया पिचेससाठी तात्पुरत्या परवान्याकरिता अर्ज विक्री शुल्क (रु.५४०/- अधिक जीएसटी) हे अनुज्ञापन खाते , २रा मजला, खोली क्र.२०२, एच/पश्चिम विभाग कार्यालय, २री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२ येथे दि.१९.०८.२०२४ ते दि.२१.०८.२०२४ रोजी सकाळी १०.३० ते सं. ५.३० या वेळेत उपलब्ध होतील. अर्जाची किंमत कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही. सदर अर्ज, अनामत रक्कम रु.२७२३/- (डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर **'बृहन्मुंबई महानगरपालिका'** या नावाने किंवा रोखीने) सहित स्विकारण्यात येईल.

वरील सर्व पट्टयांचे वितरण दि.०२.०९.२०२४, दि.०३.०९.२०२४ आणि दि.०४.०९.२०२४ रोजी सकाळी १०.३० वा पासून करण्यात येईल.

सर्व तात्पुरत्या पिचेसचे पट्टे दर्शविणारा आराखडा एच/पश्चिम विभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात आला आहे.

ज्या अर्जदारास पट्टयाचे वितरण झाले आहे, अशा अर्जदाराने कोणत्याही अटींचे अगर शर्तींचे उल्लंघन केल्यास त्याची सुरक्षा अनामत ठेव जप्त करण्यात येईल आणि परवानगी रद्द करण्यात येईल. त्याचप्रमाणे त्याचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल आणि भविष्यात पट्टे वितरणात त्याला सहभाग घेता येणार नाही.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेने आपल्याकडे राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)** | **सहाय्यक आयुक्त** |
| **एच/पश्चिम विभाग** | **एच/पश्चिम विभाग** |